




ॲड. श्री. परेश आचरेकर
B.com L.L.B.
वकील, उच्च न्यायालय
ऐरोली - मुंबई

# सेवा.

**उद्योगांची मुख्यतः** तीन क्षेत्रे आहेत, एक म्हणजे कच्चा माल उत्पादन, दुसरे म्हणजे वस्तू उत्पादन व तिसरे सेवा क्षेत्र. कच्चा माल व वस्तू उत्पादनाच्या तुलनेत सेवा क्षेत्रात मनुष्यबळ विपुल हवे असते त्यामुळे रोजगार व अर्थशास्त्राच्या दृष्टीकोनातून सेवा क्षेत्राचे महत्त्व फार आहे.
''जीडीपी'' च्या बाबतीत भारताचा जगामध्ये सेवा क्षेत्रात ११ वा क्रमांक लागतो व भारतात सेवाक्षेत्रातील ''जीडीपी'' चा हिस्सा जवळजवळ ११८५ अब्ज डॉलर एवढा आहे. त्यामुळे, आपल्या भारतीय अर्थशास्त्रात सेवा क्षेत्र महत्त्वाची भूमिका बजावते. माहिती तंत्रज्ञान उद्योग हा सेवा क्षेत्रातील महत्त्वाचा उद्योग आहे. सेवा क्षेत्रातील उलाढालींवर भारत देशात सेवा कर आकारला जातो. सध्या नव्या येऊ घातलेल्या जी.एस.टी. कायद्यात देखील सेवा क्षेत्रातील उद्योगांवरील कराबाबत तरतूद केली आहे.
**सेवा क्षेत्रात मोडणारे उद्योग खालील प्रमाणे :-**

१. माहिती तंत्रज्ञान क्षेत्र
२. विपणन क्षेत्र
३. जाहिरात क्षेत्र
४. रिअल इस्टेट क्षेत्र
५. विमा क्षेत्र
६. बँकिंग व वित्तीय क्षेत्र
७. वैद्यकीय क्षेत्र
८. हॉटेल व केटरिंग व्यवसाय
९. शिक्षण, मनोरंजन व क्रिडा क्षेत्र
१०. ट्रान्सपोर्ट व पॅकेजिंग सेवा
११. वैज्ञानिक संशोधन क्षेत्र
१२. कृषी सेवा
१३. दूरसंचार व्यवसाय
१४. सुरक्षा सेवा
१५. सुरक्षा सेवा
१६. पर्यटन व्यवसाय
१७. ब्युटी केअर व सलून सेवा
१८. डिझायनिंग उद्योग

१९. आयात निर्यात उद्योग

२०. सल्लागार उद्योग

२१. प्लेसमेंट उद्योग

२२. दुरूस्ती व देखभाल उद्योग

२३. बिपीओ, केपिओ व एलपीओ उद्योग

२४. कॉल सेंटर उद्योग

२५. विमान सेवा

२६. सामाजिक संस्था

२७. पत्रकारिता उद्योग

सेवा क्षेत्रातील उद्योग सुरू करावयाचा असल्यास त्या क्षेत्रातील विशीष्ट ज्ञान असणे आवश्यक असते. काही उद्योगांबाबत सरकारकडून परवाने, परवानग्या घ्याव्या लागतात. उदा. विधी, वैद्यक सेवा, आयात निर्यात, अन्नसेवा इ. तर काही उद्योगांबाबत अशा सरकारी परवाने व परवानग्यांची आवश्यकता नसते. कंपनी, एलएलपी, भागीदारी संस्था, सहकारी संस्था किंवा सिंगल फर्म स्थापना करून व करांचे नोंदणीकरण करून सेवा उद्योग सुरू करता येतो. फ्लिपकार्ड, एमेझोन, ईबे, मिन्त्रा, शॉपक्लूज इ. झपाट्याने भरभराटीस आलेल्या ऑनलाईन विपणन कंपन्या ह्या सेवा क्षेत्रातील आहेत. सध्या रिलायन्स च्या मुकेश अंबानी यांनी दणक्यात सुरू केलेली ''जिओ'' देखील सेवा क्षेत्रातील कंपनी आहे. सध्या बाजारात असलेल्या उबर, ओलाय ह्या कंपन्या देखील सेवा क्षेत्राचाच भाग आहे. ग्राहक पुरवठा करणाऱ्या जस्ट डायल व सुलेखा ह्यांसारख्या कंपन्याचे सेवा क्षेत्रातील महत्त्व फार आहे. रोजगारीचा विचार करता सेवा क्षेत्रात महत्त्वाची भूमिका बजावते. तसेच सेवा क्षेत्रातील उलाढाल ही फार मोठी असते. फेसबुक, ट्विटर व व्हॉट्सअप ह्या सेवा क्षेत्रातील सोशल नेटवर्किंग साईट्स व मोबाईल ॲप मुळे जग जवळ आले आहे. तसेच ह्या नेटवर्किंग वेब पोर्टल चा वापर करून उद्योग व व्यवसाय वृद्धिंगत करण्यास व आपले विचार जगासमोर मांडण्यास सोपे जात आहे. भारतात ह्या काही वर्षांमध्ये सेवा क्षेत्र फार भरभराटीस आले. मोबाईल, दूरसंचार, डीटीएच, बँकिंग व विमा, ऑनलाईन विपणन व मनोरंजन क्षेत्रात फार भरभराट झाली आहे. सेवा क्षेत्रात प्रदुषणासारखी समस्या नसल्याने इको फ्रेंडली दृष्टीकोनातून सेवा क्षेत्रातील व्यवसाय फार महत्त्वाची भूमिका बजावतात. त्यामुळे सेवा क्षेत्रातील ग्राहकांची संख्या विपुल असल्याने व भारतातील लोकसंख्येचा विचार करता सेवा क्षेत्रात गुंतवणूक करणे फायद्याचे ठरेल.